بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ　نَحْمَدُہٗ وَنُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ　وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصاراللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# बदर युद्धाबाबत पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) चे व्यक्मित्व आणि ऐतिहासिक व श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. ६-१०-२०२३ स्थान मशिद मुबारक टिलफर्ड, लंडन

بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰہِ رَبِّ الْعٰلَمِیْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ۔ مٰلِکِ یَوْمِ الدِّیْنِ۔ اِیَّاکَ نَعْبُدُ وَاِیَّاکَ نَسْتَعِیْنُ۔ اِھْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِیْمَ۔ صِرَاطَ الَّذِیْنَ اَنْعَمْتَ عَلَیْھِمْ غَیْرِ الْمَغْضُوْبِ عَلَیْھِمْ وَلَا الضَّآلِّیْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह-फतिहा पठण केल्यानंतर, हुजूर अनवर म्हणाले की अस्माच्या हत्येची घटना ज्याचे मागच्या प्रवचनात वर्णन केले गेले होते आणि मी म्हणालो होते की अशीच एक समान घटना (खोटी) आहे. दुसरी घटनाही रचलेली कथा आहे असे वाटते. ही दुसरी घटना म्हणजे अबू अफक यहूदीची हत्या.

त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे: एके दिवशी पवित्र पैगंबर साथीदारांना म्हणाले! असा कोण आहे जो माझ्यासाठी या दुष्ट माणसाशी, म्हणजे अबू अफक (ज्यू) याच्याशी व्यवहार करू शकेल, म्हणजे त्याचा नाश करू शकेल असा कोणी आहे का? ही व्यक्ती म्हणजेच अबू अफक हा खूप म्हातारा माणूस होता, तो एकशे दोन वर्षांचा होता असेही म्हटले जाते, परंतु तो लोकांना पवित्र पैगंबर (स.) च्या विरोधात भडकावत होतात आणि आपल्या कवितांमध्ये त्यांच्याबद्दल अपमानास्पद आणि अवहेलनात्मक भाषा वापरायचा. पवित्र प्रेषितांच्या या म्हणण्यावर, हजरत सलीम बिन उमैर उठले (ते अशा लोकांपैकी एक होते जे अल्लाहच्या भीतीने खूप रडायचे आणि बदरच्या युद्धात देखील सहभागी झाले होते), ते म्हणाले: माझ्याकडे एक नवस आहे. आणि तो नवस पूर्ण करण्याच्या प्रयत्नात मी एकतर अबू अफकला मारीन किंवा माझा जीव देईन. म्हणून त्यानंतर ते संधी शोधू लागले, एके दिवशी जेव्हा रात्रीची वेळ होती आणि खूप उष्णता होती, तेव्हा अबू अफक त्याच्या घराच्या अंगणात झोपला होता. तेथे येऊन त्याने आपली तलवार अबू अफकच्या यकृतावर ठेवली आणि तलवार पोटातून जाईपर्यंत त्याच्यावर पूर्ण दाब दिला आणि त्याच वेळी अबू अफक भयंकर ओरडला, त्याला तशाच अवस्थेत सोडून तिथून निघून गेले. त्याचा आरडाओरडा ऐकून लोक धावून आले आणि त्याच्या काही साथीदारांनी त्याला उचलून घरात नेले, परंतु देवाच्या शत्रूला हा आघात सहन झाला नाही आणि त्याचा मृत्यू झाला.

या घटनेचा खुलासा करताना हुजूर अनवर म्हणाले! ही घटना कोणत्याही विश्वासार्ह दस्तऐवजाद्वारे वर्णन केलेली नाही, सिहा सित्ता (हदीसची सहा विश्वासार्ह ग्रंथ) मध्येही तिचा उल्लेख नाही. इब्ने साद, सिरत अल-हल्बिया, शरह झरकानी, तबकतुल-कुब्रा, इब्न हिशाम, अल-बदायाह वन्नहियाह, किताब अल-मगाझी अल-वक्दी आणि सबल अल-हादी वर्रशाद इत्यादी यांसारख्या चरित्रात्मक पुस्तकांमध्ये त्याचा उल्लेख आहे. परंतु इतिहासाच्या बहुतेक पुस्तकांमध्ये ही घटना नोंदलेली नाही, उदाहरणार्थ, अल कामिल फित्तारीख, तारिख अल-तिब्री, तारिख इब्ने खलदुन इ.

या घटनेबाबत, अस्माच्या घटनेप्रमाणे, ही साक्ष सांगितली जाते की तो लोकांना अल्लाहच्या पैगंबराशी वैर आणि विरोध करण्यास प्रवृत्त करत असे. बदरच्या युद्धानंतर, त्यात द्वेष आणि मत्सर अधिक वाढला आणि तो उघडउघड बंडखोर बनला. अबू अफकच्या हत्येबद्दलच्या परंपरेतील अंतर्गत विरोधाभास देखील या घटनेला संशयास्पद बनवतात. उदाहरणार्थ, नंबर एक म्हणजे हत्या करणाऱ्याबद्दल मतभेद: इब्ने साद आणि वकिदी यांच्या मते, अबू अफकचा मारेकरी सालम बिन उमेर होता, तर काहीं परंपरामध्ये, सलीम बिन उमर आणि कझाकर होते. इब्नेक अकबाच्या कथनानुसार सलीम बिन अब्दुल्लाने त्याला मारले. दुसरे, हत्येच्या कारणामध्ये मतभेद आहेः इब्न हिशाम आणि वकिदीच्या मते, सलीमने स्वतःच्या आवेगात त्याला मारले, तर काही परंपरेनुसार, अल्लाहच्या पैगंबराच्या आदेशानुसार त्याला मारण्यात आले. धर्माच्याबाबत तिसरी गोष्ट आहे. इब्न सादच्या मते अबू अफक हा ज्यू होता, तर वक्दीच्या मते तो यहूदी नव्हता. परत हत्येच्या काळाबाबतही मतभेद आहेः वक्दी आणि इब्ने सादच्या मते, ही घटना अस्मा बिंत मारवानच्या हत्येनंतरची आहे, तर इब्ने इशाक आणि इब्ने हिशाम इत्यादींच्या मते, ही घटना अस्माच्या हत्येपूर्वीची आहे. या स्पष्ट तफावतींवरून हेही स्पष्ट होते की ही निव्वळ रचलेली आणि खोटी कथा आहे आणि त्यात तथ्य नाही.

अबू अफकची हत्या ही खरी मानली जरी गेली तरी त्याचे गुन्हे जसे, राज्यप्रमुखाच्या हत्येला प्रवृत्त करणे, व्यंगात्मक कविता सांगून युद्ध भडकवणे, सार्वजनिक शांतता धोक्यात आणणे आणि युद्ध भडकावणे हे मृत्यूदंडासाठी पुरेसे आहे, जसे की आजही सरकारविरुद्ध बंड करणाऱ्याला फाशी दिली जाते, हे सिद्ध झाले आहे. फक्त शिव्याशाप करणे हे हत्येचे कारण असू शकत नाही. तसेच अस्माच्या घटनेप्रमाणे अबू अफकच्या हत्येनंतर ज्यूंच्या कोणत्याही प्रतिक्रियेचा पुरावा नाही, त्यामुळे त्यांचे मौन ही घटना खोटी असल्याचा निर्णायक युक्तिवाद आहे.

हे देखील लक्षात ठेवण्यासारखे आहे की या घटनांचे वर्णन बदरच्या लढाईपूर्वी किंवा नंतर केले गेले आहे आणि सर्व इतिहासकार सहमत आहेत की मुस्लिम आणि ज्यू यांच्यातील पहिला संघर्ष बनू कैनकाच्या आक्रमणाचा होता. जर बदरच्या आधीही एखादी घटना घडली असती तर त्यांनी ती नमूद केली असती आणि अबू अफक आणि अस्मा या

ज्यूंच्या हत्येच्या घटनांच्या आधारे मुस्लिमांवर असा आक्षेप घेतला असता. कोणत्याही इतिहासात, ज्या इतिहासकारांनी या कथा कथन केल्या आहेत, त्यांच्या पुस्तकांमध्येही, मदिनाच्या ज्यूंनी या घटनांबाबत असा प्रश्न कधी उपस्थित केल्याचा निश्चितपणे उल्लेख नाही. जर एखाद्या व्यक्तीला अशी कल्पना आली की त्यांनी कदाचित आक्षेप घेतला असेल परंतु मुस्लिम इतिहासकारांनी त्याचा उल्लेख केला नसेल तर ती चुकीची आणि निराधार कल्पना असेल, कारण कोणत्याही मुस्लिम मुहद्दीथ किंवा इतिहासकाराने विरोधकांच्या कोणत्याही आक्षेपावर पडदा टाकलेला नाही, उदाहरणार्थ, जेव्हा सिरिया नखला या कथेत मक्काच्या बहुदेववाद्यांनी मुस्लिमांवर हल्ला केला. सर्वात पवित्र महिन्याचा अपवित्रतेचा आरोप केला, तेव्हा मुस्लिम इतिहासकारांनी त्यांचा आक्षेप त्यांच्या पुस्तकांमध्ये परिपूर्ण सचोटीने नोंदवला. त्यामुळे या प्रसंगीही ज्यूंच्या बाजूने काही आक्षेप आला असता तर इतिहास त्याच्या उल्लेखाशिवाय राहिला नसता. तथापि, कोणत्याही शोधातून, या कथा खऱ्या आहेत असे सिद्ध होत नाही आणि असे दिसते की एकतर छुप्या शत्रूने या कथा एखाद्या मुसलमानाचा संदर्भ देऊन कथन केल्या असेल आणि नंतर त्यांना मुस्लिमांच्या परंपरांमध्ये प्रवेश मिळाला आहे किंवा एखाद्या कमकुवत मुस्लिमाने आपल्या कबिल्याचे गुणगौरव करण्याच्या हेतूने की, अशा कठोर विरोधींची हत्या करून आम्ही इस्लामची अनन्यसाधारण सहाय्यता केली आहे, असा श्रेय देण्यासाठी या परंपरा इतिहासात जोडले असावे. बाकी ईश्वर जाणो की सत्य काय आहे.

हजरत साहिबजादा मिर्झा बशीर अहमद साहिब यांनी अस्मा आणि अबू अफक यांच्या हत्येच्या काल्पनिक घटनांचा उल्लेख करताना सिरत खतमुन्नबिय्यीन मध्ये म्हटले आहे की, बदरच्या युद्धाच्या घटनांनंतर वाकिदी आणि इतर काही इतिहासकारांनी अशा दोन घटनांची नोंद केली आहे. जे हदीस आणि इतिहासाच्या पुस्तकांमध्ये सापडत नाहीत आणि त्यांचा बारकाईने विचार केला तरी ते बरोबर सिद्ध होत नाहीत, परंतु ते पवित्र प्रेषितांवर प्रत्यक्ष आक्षेप घेत असल्याने, काही ख्रिश्चन इतिहासकारांनी नेहमीप्रमाणे अतिशय अप्रिय रीतीने त्यांचा उल्लेख एका पुस्तकात केला आहे. पण उलट तपासणी आणि टीकेला सामोरे जाताना या घटना खऱ्या ठरत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

त्यांच्या सत्यतेबद्दल शंका निर्माण करणारा पहिला युक्तिवाद हा आहे की हदीसच्या पुस्तकांमध्ये या घटनांचा उल्लेख नाही, आणि केवळ हदीस नव्हे तर काही इतिहासकारांनी त्यांचा उल्लेख केलेला नाही. तथापि, जर अशा घटना खरोखर घडल्या असत्या तर हदीसच्या पुस्तकांमध्ये आणि इतिहासाच्या काही पुस्तकांचा उल्लेख केला नसता असे काही कारण नव्हते. या क्षणी, यात शंका नाही की या घटनांमुळे पवित्र प्रेषित आणि त्यांच्या साथीदारांविरुद्ध एक प्रकारचा आक्षेप दिसून येत असल्याने, मुहद्दीसिन आणि काही इतिहासकारांनी त्यांचा उल्लेख सोडून दिला असावा, कारण सर्वप्रथम, या घटना आणि या परिस्थितीचा विचार करता. ज्यामध्ये ते आले ते आक्षेपार्ह नाहीत. दुसरे म्हणजे, ज्याला

हदीस आणि इतिहासाचा अगदी माफक अभ्यास आहे तो हे सत्य लपवू शकत नाही की मुस्लिम विद्वान आणि इतिहासकारांनी कोणत्याही परंपरेचा उल्लेख केवळ इस्लाम आणि इस्लामच्या संस्थापकावर उघड आक्षेप घेतल्यामुळे कधीही सोडला नाही. याचे कारण म्हणजे त्यांचा मूलभूत कायदा होता की, ज्या गोष्टी परंपरेच्या आधारे उचित जाणत होते त्यास नमूद करण्यात ते विचार करत नसे. प्राच्यविद्यावादी मिस्टर मार गोलिस यांच्यासारखी व्यक्ती, जी सामान्यतः सर्व गोष्टींशी असहमत असते, या घटनांबाबत मुस्लिमांना दोष देत नाही.

हुजूर अनवर म्हणाले! या सर्व बनावट गोष्टी आहेत ज्याचे श्रेय पवित्र प्रेषित (स.) यांना दिले गेले आहे, या इतिहासकारांनी जो काही नमूद केले, नंतर त्याचे योग्य विश्लेषण करणे आवश्यक होते. हे सर्वशक्तिमान अल्लाहचे आभार आणि कृपा आहे की त्याने आम्हाला युगाच्या अवताराला स्वीकार करण्याची संधी दिली. आणि आम्ही त्याची वास्तविकता पाहिल्यानंतर, विश्लेषण करून आणि समजून घेतल्यानंतर सर्वकाही स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो आणि पवित्र प्रेषिताच्या व्यक्तीत्वावर लावलेल्या आरोपांचे खंडन करण्याचा प्रयत्न करतो. अल्लाह अशा विद्वानांना सद्बुद्धी देवो जे अशा गोष्टी करून केवळ स्वतःचे हित साधतात आणि इस्लामला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. एकीकडे ते इस्लामची सेवा करत असले तरी प्रत्यक्षात त्यांच्या कृतीनेच त्यांच्यात अतिरेकीपणा निर्माण झाला आहे. अल्लाह त्यांनाही सद्बुद्धी देवो.

शेवटी हुजूर अनवर यांनी कॅनडाचे प्रो.डॉ.नासीर अहमद खान साहिब परवेझ फराझी, रबवाहचे मा. शरीफ अहमद भट्टी साहिब, प्रो. अब्दुल कादिर डाहरी साहिब माजी अमीर जमाअत अहमदिया जिल्हा नवाबशाह आणि अमेरिकेचे प्रो. डॉ. मुहम्मद शरीफ खान साहिब यांच्या निधनाची खबर दिली आणि त्यांच्या चांगल्या आणि सामुदायिक सेवांचा उल्लेख केला. आणि सरतेशेवटी त्यांची नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔